आर.सी.सी. क्र. १७०/२०२१
सरकार वि. राहुल व इतर
निशाणी क्र. ३७

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**
**मी प्रतिज्ञा पुर्वक निवेदन करते की,**

| | |
|---|---|
| माझे नाव | – वंदना दशरथ ननवरे, |
| वय | – ४५ वर्ष |
| धंदा | – घरकाम, |
| राहणार | – पंचशील नगर, पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी. |

**सरतपास सरकार तर्फे श्री. पी. एन. सोळंके, विशेष सरकारी वकील यांचे मार्फत**

**(निशाणी क्र. ३२ वरील अर्जावरील आदेशान्वये प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष आरोपी क्र. १ यांच्या ओळखीचा वाद न करण्याच्या अटीवर त्यांच्या गैरहजेरीमध्ये नोंदविण्यात आली. )**

१. मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी क्र. १ राहुल हा माझा भाचा आहे, आरोपी क्र. २ गौतम हा माझा भाऊ आहे आणि आरोपी क्र. ३ सुशिला ही भावजयी आहे. घटना अंदाजे पाच ते सहा वर्षापूर्वी पंचशील नगर येथे सायंकाळी ०५.०० ते ०६.०० च्या सुमारास घडली. सदर दिवशी मी माझ्या आईच्या घरी होते. सदर दिवशी माझ्या भावजयी सोबत थोडी किरकीर झाली होती. याच्या व्यतिरिक्त सदर दिवशी इतर काहीही घडले नाही. प्रस्तुत किरकीरीमुळे मी पोलीस स्टेशन पूर्णा येथे तक्रार दाखल केली होती. आता मला दिनांक ०३.०६.२०२१ रोजीची फिर्याद दाखवण्यात आली, त्यातील मजकूराबाबत मला काहीही माहिती नाही, सदर फिर्यादीवर माझी सही असून ती मी ओळखतो, साक्षीदाराने फिर्यादीवरील सही ओळखल्यामुळे सहीस **<u>निशाणी क्र. ३८</u>** देण्यात येते.

***साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.***

२. दिनांक ०३.०६.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजण्याच्या सुमारास मी माझ्या घराच्या अंगणात बसले होते किंवा कसे हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी आरोपी माझ्या सोबत तुम्ही राजाराम बालाजी आहिरे यांची पेन्शन का खात हे विचारुन वाद घातला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपी गौतम व सुशिला यांनी मला शिवीगाळ

केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्यांना मी शिवीगाळ का करता याचा जाब विचारला असता माझा भाचा राहुल याने हातातील काठीने मला डोक्यात मारुन जखमी केले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी राहुलने मला जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी घरी गेल्यानंतर सदरच्या घटनेबाबतची माहिती माझ्या मुलीला व पतीला सांगितली होती. सदर तक्रार मी माझ्या मुलीसोबत व पतीसोबत जावून दिली होती. आता मला माझ्या फिर्यादीतील मजकूर अधोरेखांकीत भाग अ प्रमाणेचा मजकूर वाचुन दाखवला, तो माझ्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी नमूद केला नाही, तसेच सदर मजकूर पोलीसांनी माझ्या तक्रारीमध्ये का नमूद केला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यामध्ये व आरोपीमध्ये आपापसात तडजोड झाली असून त्या अशयाची पुरसीस मी अभिलेखावर दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा होउ नये म्हणून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उत्तर सूचक प्रश्न संपले

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एस. पाईकराव यांच्या मार्फत**

नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–
(एस. एस. साळुंखे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
पूर्णा.

दिनांक – १५.०७.२०२६